जा.क्र.नांवाशमनपा/जवमा/ १७०१ /२०२५
दिनांक - 6/MAY/2025

# ई-लिलाव सुचना (दुस-यांदा)

सर्व नागरीकांना या जाहिर ई-लिलाव (E-AUCTION) सुचनेद्वारे कळविण्यात येते की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालकीचे काबरानगर जलशुद्धीकरण केंद्र येथील व्यापारी संकुलातील उर्वरीत ०६ गाळे/दुकाने ई-लिलावाने प्रथम १० वर्ष तदनंतर १०+१० असे एकुण ३० वर्षासाठी भाडेपट्टीवर द्यावयाचे आहेत.

ईच्छुक नागरीकांनी / व्यापा-यांनी लिलावात विहित मुदतीत भाग घेण्यासाठी (https://eauction.gov.in) या संकेतस्थळावर digital signature चे रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे.

लिलावधारक/ठेकेदार यांनी लिलाव फी रुपये ५०००/- (ना परतावा) तसेच इसारा रक्कम म्हणून रु.२५,०००/- आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांच्या नांवे असलेले खाते क्रं.३१८०१०२००००२१३ IFSC CODE - UTIB०००००३१८ ॲक्सीस बँक, शाखा कलामंदिर, नांदेड या खात्यामध्ये RTGS/NEFT करुन त्या बाबतची पावती अपलोड करणे अनिवार्य आहे.

सदरील ई-लिलावाच्या नियम व अटी तसेच साईटवर अपलोड करावयाच्या कागदपत्रांची यादी (https://eauction.gov.in) या संकेस्थळावर उपलब्ध करण्यात आले असुन, सदरचा ई-लिलाव (E-AUCTION) ऑनलाईन इंटरनेटवर वर भरता येईल.

## ई-लिलाव प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ.क्र. | तपशिल | लिलाव प्रसिध्दीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | प्रसिध्द दिनांक | 07/05/2025 | १५:०० |
| २ | कागदपत्र/ऑक्शन फी सुरु करण्याचा दिनांक व वेळ | 07/05/2025 | १६:०० |
| ३ | कागदपत्र अपलोड/ऑक्शन फी भरणा करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 21/05/2025 | १५:०० |
| ४ | कागदपत्र/ऑक्शन मंजुरीचा दिनांक व वेळ | 21/05/2025 | १५:०० |
| ५ | कागदपत्र/ऑक्शन फी मंजुरीचा अंतिम दिनांक व वेळ | 22/05/2025 | १८:०० |
| ६ | ई-लिलाव सुरु करण्याचा दिनांक व वेळ | 23/05/2025 | ११:०० |
| ७ | ई-लिलाव अंतिम दिनांक व वेळ | 23/05/2025 | १५:०० |

कोणतेही कारण न देता सदरचा ई-लिलाव अंशतः/पुर्णता मंजुर किंवा नामंजुर करण्याचा अंतिम अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी राखुन ठेवला आहे.

ई-लिलाव बाबत कांही शंका अथवा तांत्रिक अडचणी असल्यास कृपया २४X७ हेल्प लाईन नं.०१२०-४००-१००५ या टोल फ्रि नंबरवर संपर्क साधावा.

अतिरीक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

प्रत -
१) संपादक, दै. लोकपत्र ............ २) दै. महासागर समाचार ............ यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील लिलावाची जाहिर सुचना आपल्या दि. 07/5/2025 च्या वृत्तपत्रात 12X20 चौ.मी. आकारात प्रसिध्द करुन बिलाच्या २ प्रती शासनाच्या मान्यतेच्या प्रतीसह सादर करावे.

२) सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग, यांना सदरील प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील ई-लिलाव उरोक्त नमुद कालावधीमध्ये घेण्यात यावा तसेच सदरील ई-लिलाव च्या नियम व अटी ची प्रत मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

३) जन संपर्क विभाग, यांना सदरची प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील ई-लिलाव सुचना तसेच नियम व अटी ची प्रत महानगरपालिका नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी.

अतिरीक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

प्रस्ताव व ई-लिलाव प्रक्रिया

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालकीचे काबरानगर जलशुद्धीकरण येथील व्यापारी संकुलातील उर्वरीत ०६ दुकाने/गाळे भाडेपट्टीवर देणेसाठी ई-लिलाव नियम अटी

**प्रस्तावना**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालकीचे काबरानगर जलशुद्धीकरण केंद्र येथे महानगरपालिकेकडुन ३१ दुकाने बांधण्यात येत आहेत. तसेच सदरील गाळ्यांचा/दुकानांचा क्रमांक मार्केटच्या पश्चिम दिशेकडुन पुर्वेकडे चढत्या क्रमाणे आहे. सदरील ठिकाणचे तळमजल्यावरील दुकाने भाडेपट्टीवर देण्यासाठी प्रिमीयम रक्कम रु.१४,३५,५९२/- या दरावर ई-लिलाव घेण्यात येत आहे.

➢ **शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर मार्केटमधील आरक्षीत गाळ्याचे विवरण-**

| अ. क्र. | व्यापारी संकुलाचे नाव | भाडेपट्टीवर देण्यात येणारे एकुण गाळे | महिला स्वयंसहाय्यीत गटासाठी आरक्षीत | विना आरक्षीत/ खुला |
|---|---|---|---|---|
| १ | काबरानगर जलशुद्धीकरण केंद्र येथील व्यापारी संकुला तील गाळे | **एकुण- ०६ गाळे** | **एकुण -०५ गाळे (गाळा क्र.११, १३,१८,२७,३१)** | **एकुण -०१ (गाळा क्र.१९)** |

➢ **वेबसाईटवर (http://eauction.gov.in) अपलोड करावयाची कागदपत्रे §**

१. ई-लिलावात भाग घेण्यासाठी व्यक्तीच्या ओळखीचा पुरावा म्हणुन आधार कार्ड/पँनकार्ड/मतदान कार्ड/ ड्रायव्हींग लायसन्स/पासपोर्ट इत्यादीची प्रत अपलोड करणे.

- ई-लिलावात भाग घेण्यासाठी रक्कम रु.५,०००/- (ई-लिलाव प्रवेश शुल्क नापरतावा) तसेच रक्कम रु.२५,०००/- आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांच्या नावे असलेले खाते क्र.३१८०१०२०००००२१३, IFSC CODE - UTIB०००००३१८ अँक्सीस बँक, शाखा कलामंदीर, नांदेड या खात्यामध्ये RTGS/NEFT करुन त्याबाबतची पावती अपलोड करणे अनिवार्य आहे. रक्कम रु.२५,०००/- ही इसारा रक्कम असणार आहे. जे बोलीधारक अंतीम बोली बोलुन गाळा/दुकान घेणार नाहीत अशा बोलीधारकांची इसारा रक्कम रु.२५,०००/- जप्त करण्यात येईल. तसेच सदरील ई-लिलावात ज्या बोलीधारकांना गाळा/दुकान भेटले नाही त्या बोलीधारकांची इसारा रक्कम रु.२५,०००/- परत करण्यात येईल. तसेच जे बोलीधारक अंतीम बोली बोलुन दुकान भाडेपट्टीवर घेतील त्यांची रु.२५,०००/- इसारा रक्कम प्रिमीयमच्या रक्कमेमध्ये समाविष्ट करण्यात येईल.
- महिला स्वयंसहाय्यीत गटाचे प्रमाणपत्र सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र अपलोड करणे.
- महानगरपालिका हद्दीतील मालमत्तेचा सालसन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कर, पाणी कर इत्यादी भरणा केलेली पावती (महानगरपालिका हद्दीत मालमत्ता नसल्यास त्याबाबतचे लेखी स्वयंघोषणापत्र) तसेच महानगरपालिकेची कोणतीही थकबाकी प्रलंबीत नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र देखील अपलोड करणे अनिवार्य आहे.

➢ **ई-लिलाव अटी व शर्ती -**

१) ई-लिलावात भाग घेण्यासाठी डिजीटल सिग्निचर असणे अनिवार्य आहे.

२) एका दुकानासाठी बोली बोलावयाची असल्यास रुपये ५,०००/- ई-लिलाव फिस भरणा करावी लागेल. तसेच एकापेक्षा जास्त दुकानासाठी बोली बोलावयाची असल्यास प्रत्येक दुकानासाठी रुपये ५,०००/- ई-लिलाव फिस दुकान क्रमांक नमुद करुन भरणा करणे अनिवार्य आहे.

३) ई-लिलाव प्रती दुकान **प्रिमीयम रक्कम रु.१४,३५,५९२/-** या दरावर घेण्यात येत आहे.

४) ई-लिलाव रक्कम ही प्रिमीयम रक्कमेच्या वर रु.२०,०००/- (अक्षरी- वीस हजार रुपये फक्त) च्या पटीत बोलणे अनिवार्य आहे.

५) ई-लिलावात सर्वात जास्त प्रिमीयम रक्कम देणा-या व्यक्तीस दुकान/गाळा मंजूरी देण्यात येईल.

६) सदरील मार्केटमधील काही गाळे/दुकानाचे बांधकाम पुर्ण झाले आहे त्या दुकानाचा ताबा लिलाव प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर देण्यात येईल. तसेच बांधकाम प्रगतीपथावर असलेल्या गाळे/दुकानाचे काम पुर्ण झाल्यानंतर ताबा देण्यात येईल.

७) गाळा मंजुर झाल्यावर प्रिमीयमची ५० टक्के रक्कम ०७ दिवसाच्या आत तसेच दुसरी ५० टक्के गाळा/दुकानाचा ताबा देतेवेळेस महानगरपालिका फंडात भरणा करावी लागेल. तदनंतरच करारनामा देण्यात येईल.

८) गाळा/दुकानाचा भाडेपट्टा करारनामा प्रथम १० वर्षासाठी करुन देण्यात येईल. तदनंतर १०+१० असा एकुण ३० वर्षाचा भाडेपट्टा कालावधी असेल.

प्रस्ताव व ई-लिलाव प्रक्रिया

९) मुळ करारनामा संपुष्टात येण्याच्या आगोदरच भाडेकरुस दुकान महानगरपालिकेस परत करावयाचे असल्यास ई-लिलावात प्राप्त झालेली अंतीम प्रिमीयम रक्कम (विना व्याजी) करारनामा संपुष्टात आल्यानंतर तीन महिन्यात परत करण्यात येईल.

१०) काबरानगर येथील व्यापारी संकुलनातील प्रत्येक गाळ्याचा आकार १८ चौ.मी आहे. सदर गाळ्यासाठी मासिक भाडे चालु बाजारभावा प्रमाणे (R.R.) रु.३०७५/- एवढे आहे. सदरील मासिक भाडे यावर १८ टक्के जी.एस.टी आकारण्यात येईल. तसेच सदरील भाडेमध्ये दर ०३ वर्षाला १०% वाढ करण्यात येईल.

११) अनामत रक्कम म्हणुन ०३ महिन्याचे भाडे महानगरपालिका फंडात भरणा करणे अनिवार्य आहे.

१२) मासिक भाडे थकीत राहिल्यास त्यावर प्रतीमहा ०२ टक्के सरळव्याज आकारण्यात येईल.

१३) लिलावधारकाने स्वखर्चाने नोंदणीकृत करारनामा महानगरपालिकेस करुन द्यावा लागेल.

१४) दुकानात पोटभाडेकरु ठेवावयाचा असल्यास महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेऊनच नियमानुसार पोटभाडेकरु ठेवावा लागेल.

१५) महानगरपालिकेच्या मान्यतेशिवाय भाडेपट्टयाचे हस्तांतरण परस्पर केले जाणार नाही किंवा मालमत्ता गहाण/तारण ठेवली जाणार नाही. तसेच त्यावर त्रयस्त पक्षाचे हितसंबंध प्रस्थापित/निर्माण करता येणार नाहीत.

१६) गाळा वापर करताना त्या इमारतीमधील इतर भाडेकरुंना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागेल. तसेच गाळ्यामध्ये बियरबार, परमीट रुम, मटन दुकान, गिरणी, छापखाना, स्फोटक वस्तू असे व्यवसाय व इतरांना त्रास पोहचविणा-या व्यवसायासाठी वापर अनुज्ञेय राहणार नाही याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास आयुक्तांचा निर्णय अंतीम राहील.

१७) गाळा/दुकाना अंतर्गत विद्युतीकरणासाठी आवश्यक ते वायरींगचे काम संबंधीतांना महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र घेऊनच स्वखर्चाने करुन घ्यावे लागेल. विद्युत मीटर गाळेधारकास बसवुन घ्यावे लागेल. तसेच देखभालीसाठी येणारा खर्च संबंधीतास स्वत भरणा करावा लागेल. याबाबतीत भाडेकरुस कोणतीही तक्रार करता येणार नाही.

१८) गाळेधारकास महानगरपालिकेचे गाळा भाडे, मालमत्ता कर व इतर कर नियमीत भरणा करणे बंधनकारक आहे. तसेच महानगरपालिकेकडुन व्यवसाय परवानाही घ्यावा लागेल.

१९) गाळेधारकास गाळ्यामध्ये महानगरपालिकेच्या पुर्व परवानगी शिवाय फेरबदल करण्याचा अधिकार राहणार नाही. तसेच रंगरंगोटीसाठी येणारा खर्च भाडेकरुस स्वत: करावा लागेल.

२०) गाळेधारकाकडे सहा महिन्यापेक्षा जास्त दिवस गाळा भाडे थकीत राहिल्यास त्या विरुद्ध महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ८१ नुसार तसेच यासंबंधीत असलेले नियम /शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच दुकान महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन प्रिमीयम रक्कमेतुन थकीत रक्कम वजा करण्यात येईल.

२१) ई-लिलाव फीस म्हणुन एका दुकानासाठी भरणा केलेल्या रक्कम रु.५,०००/- च्या पावतीचा वापर इतर दुकानांसाठी केल्यास बोलीधारकाविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

२२) बोलीधारकांनी बोललेल्या अंतीम प्रिमीयम बोली रक्कमेमध्ये काही तांत्रिक किंवा बोलीधारकाने वेबसाईटवर अपलोड केलेल्या कागदपत्रांमध्ये तफावत आढळुन आल्यास अंतीम बोलीधारक ठरविण्याचा अधिकार आयुक्त यांना राहील.

२३) ई-ऑक्शन या संकेतस्थळावर प्राप्त झालेली बोलीची नोंद हीच अंतीम असेल.

२४) सदरील ई-लिलाव कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा, नियम अटीमध्ये अंशत: बदल करण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांना राहील. त्याबाबत लिलावधारकास कोणताही आक्षेप घेता येणार नाही.

२५) सदर ई-लिलाव https://eauction.gov.in या संकेतस्थळावर घेण्यात येत आहे.

२६) सदरील नियम अटी https://eauction.gov.inया संकेतस्थळावर तसेच www.nwcmc.gov.in या महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर; मनपा मुख्य प्रशासकिय इमारत येथे नोटीस बोर्डवर, मुख्य प्रशासकिय इमारत मालमत्ता विभाग (कक्ष क्र.२१५) इत्यादी ठिकाणी पहावयास मिळतील.

२७) सदरील लिलाव हा ई-लिलाव असुन बोलीधारक यांना उपरोक्त नमुद कागदपत्र वेबसाईटवर अपलोड करावयाची आहेत. सदरील कागदपत्रांची पूर्तता न केल्यास त्यांची बोली रद्द करुन संबंधीतास लिलाव प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

अतिरीक्त आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड